जिल्हा रुग्णालय, वाशिम येथील १२ अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदआ - २०१६ /प्र.क्र.१२/आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीखः २८ जानेवारी,२०१६.

वाचा -

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक -पदआ २०१४/प्र.क्र.१५४/ आरोग्य -३, दिनांक- १८.०३.२०१५.**
२) **आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-५/सन २०१५-१६/जिरु वाशिम/अपदे-११/१०५३५-३६/१५, दिनांक-२१.११.२०१५.**
३) **आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-५/सन २०१५-१६/जिरु वाशिम/अपदे-१/१०५३९-४०/१५, दिनांक-२१.११.२०१५.**

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांच्या अधिपत्याखालील २०० खाटांच्या श्रेणीवर्धीत जिल्हा रुग्णालय, वाशिम येथील नव्याने मंजूर पदांपैकी भरण्यात आलेल्या ५ अस्थाई पदांना दि.१.३.२०१५ ते दि.२९.२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. आता या शासन निर्णयान्वये जिल्हा रुग्णालय, वाशिम येथील नव्याने भरण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) वर्ग-१ या एक पदास दि.०१.०३.२०१५ ते दि.२९.०२.२०१६ पर्यंत तसेच अभिलेखापाल (१ पद), अधिपरिचारीका (१० पदे) या ११ अस्थाई पदांना सदर पदे भरण्यात आलेल्या दिनांकापासून ते दि.२९.२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

<u>मागणी क्रमांक-आर-१</u>

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०१ - नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा
११० - मुफसल क्षेत्रातील शासकीय रुग्णालये व दवाखाने
(०१)(०१) - मुसफल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (२२१० ०१४६)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१५/प्र.क्र.५/१५/वित्तीय सुधारणा-१, दिनांक-२०.०२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२७१२५८४४९९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Indalkar

Digitally signed by Prakash Indalkar
DN: CN = Prakash Indalkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2016.01.28 15:30:28 +05'30'

(प्रकाश इंदलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. संचालक,आरोग्य सेवा, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा, (वैद्यकीय) मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, वाशिम
७. जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम.
८. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
१०. निवडनस्ती (आरोग्य-३)